# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २८/०८/२०१७

## सजा वडेश्वर ता. वडगांव मावळ येथील तलाठयास दोन हजार रूपयांची लाचेची मागणी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केलेबाबत..

---

यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीची सातबारा उताऱ्यावर नोंद घेण्यासाठी सजा वडेश्वर ता. वडगांव मावळ येथील तलाठी संजय कांबळे याने तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक ०१/०७/२०१७ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक संजय कांबळे याने तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीची सातबारा उताऱ्यावर नोंद घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रू. लाच रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती २,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून आज रोजी वडगांव मावळ पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर नंबर ०२०७/२०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयामध्ये लोकसेवक आरोपी संजय राजाराम कांबळे वय - ५५ वर्षे, तलाठी, सजा वडेश्वर ता. वडगांव मावळ जिल्हा पुणे यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( दत्तात्रय भापकर )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.